# साडेतीन हजार चिमुकल्यांनी साकारले 'इको फ्रेंडली बाप्पा'

## के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे इको फ्रेंडली गणेशमूर्ती कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** प्लास्टर आफ पॅरिसपेक्षा शाडूमातीची मूर्ती तयार करून तिची प्रतिष्ठापना करत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी हजारो चिमुकल्यांनी गणेशमूर्तीला आकार देत इको फ्रेंडली गणेशोत्सवाचा श्रीगणेशा केला. निमित्त होते के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक आणि स्मार्ट मॅनेजमेंट इंटरफेस लोकल एक्सचेंज (स्माईल) व स्पिनॅच सेंटर ऑफ एक्सलन्स यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रांगणात रविवारी (दि. १) आयोजीत इको फ्रेंडली गणेशा कार्यशाळेचे.

कार्यशाळेचे यंदाचे हे सहावे वर्ष आहे. यावेळी जिल्ह्यातील विविध शाळांच्या ३५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी हजेरी लावत गणपती बाप्पाची मूर्ती साकारली. बहुतांश विद्यार्थी त्यांनी साकारलेल्या शाडू मातीच्या बाप्पाची प्राणप्रतिष्ठापना करणार आहेत. या कार्यशाळेला प्रमुख पाहुणे म्हणून नाशिक महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता प्रशांत पगार, श्री सप्तश्रृंग निवासिनी देवी ट्रस्टच्या विश्वस्त मनज्योत पाटील, आडगाव पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सचिन खैरनार, म्हसरूळ पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अतुल डहाके, माजी नगरसेवक उद्धव निमसे, माजी नगरसेवक सुरेश खेताडे, माजी नगरसेविका ऋची कुंभारकर उपस्थित होते. संस्थेच्या विश्वस्त शकुंतला वाघ, जनसंपर्क सचिव अजिंक्य वाघ, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, प्राचार्य पी. टी. कडवे, बाळ नगरकर, प्राचार्य सचिन जाधव आदी उपस्थित होते.



के. के. वाघ शाळेत गणपती बाप्पांची मूर्ती साकारताना चिमुकले.

## रंगूबाई जुन्नरे शाळेत विद्यार्थ्यांनी बनविल्या मूर्ती

- नाशिक : रंगूबाई जुन्नरे इंग्लिश मीडियम प्रायमरी स्कूल येथे दरवर्षीप्रमाणे विद्यार्थ्यांमध्ये कलाकौशल्य विकसित व्हावे या उद्देशाने गणपतीची मूर्ती बनविण्याची कार्यशाळा नुकतीच घेण्यात आली. या कार्यशाळेचे उद्घाटन शाळेच्या मुख्याध्यापिका कल्याणी अग्निहोत्री यांच्या हस्ते करण्यात आले.
- **चौथीच्या मुलांना शाडू माती उपलब्ध करून देण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत विविध आकाराच्या व आकर्षक अशा गणपतीच्या मूर्ती बनवल्या. विद्यार्थ्यांना शाळेतील कलाशिक्षिका यांचे मार्गदर्शन लाभले.**

## पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळा

एकलहरे : हिंगवेढे येथील आयुषी इंटरनॅशनल स्कूलमध्ये पर्यावरणपूरक गणपती मूर्ती बनवण्याची कार्यशाळा घेऊन विद्यार्थ्यांनी बनविलेल्या सुबक व आकर्षक गणेश मूर्तींचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. आपल्या पाल्यांनी बनविलेल्या आकर्षक गणेशमूर्ती पाहून पालकांनी कौतुक केले. शिक्षण संस्थेचे अध्यक्ष केरू पाटील धात्रक यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. सचिव विक्रम धात्रक यांनी कार्यशाळा आयोजित करण्याचा उद्देश सांगितला. विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक मूल्यांची जपणूक आणि कलात्मक कौशल्यांचा विकास व्हावा, हा कार्यशाळेचा उद्देश होता. ही कार्यशाळा शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्मार्ट बोर्डच्या साहाय्याने पार पडली. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीतील श्री गणेशाचे महत्त्व समजले, तसेच पारंपरिक कलेचे जतन कसे करता येईल हे देखील शिकले. शिक्षकांनी या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना सतत प्रोत्साहित केले आणि योग्य मार्गदर्शन दिले.